**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक** 07/03/2026

**आरोपी लोकसेवक** - 1) आलोसे श्री. मन्साराम बाबुराव लोखंडे, पद पोलीस पाटील, मौजे किन्ही , ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर,2) श्री संतोष भगवान शेळके वय 43, रा.किन्ही, तालुका सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर (खाजगी ईसम ) यांनी तक्रारदार यांचेकडुन 3,000/- रुपये लाच स्विकारल्याने आरोपी लोकसेवक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळयात.

| | |
|---|---|
| ला.प्र. विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा पोलीस ठाणे | पोलीस ठाणे सोयगाव, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | 1) आलोसे श्री. मन्साराम बाबुराव लोखंडे, पद पोलीस पाटील, मौजे किन्ही , ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर,2) श्री संतोष भगवान शेळके , रा.किन्ही, तालुका सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर (खाजगी ईसम ) |
| लाच मागणी रक्कम | 5,000/- (पाच हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 3,000/- (तीन हजार रुपये) |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री. केशव दिंडे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्री. योगेश शिंदे,पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे महिलेसोबत झालेले भांडण मिटवले व पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल होऊ दिला नाही याचा मोबदला म्हणून, 5,000/-रुपयाची मागणी केली होती. |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 07/03/2026 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, यातील आरोपी क्र.1 मन्साराम लोखंडे, पोलीस पाटील यांनी पंच 1 व आरोपी क्र.2 यांच्या समक्ष तक्रारदार यांच्याकडे त्यांचे विरुद्ध तक्रार पोलिसात दाखल होऊ दिली नाही याचा मोबदला म्हणून 5000 रुपयाची मागणी करून, तडजोडीअंती 3000 रुपये स्वीकारण्याचे मान्य केले व लाचेची रक्कम आरोपी क्र. . 2 संतोष शेळके, खाजगी इसम यांच्याकडे देण्यास सांगितले.<br>लाच मागणी नंतर दिनांक 07/03/2026 रोजी शासकीय पंचासमक्ष सापळा कारवाई दरम्यान डोंगर किन्ही गावातील अशोक नारायण भोई यांचे चहा पाण्याचे हॉटेलमध्ये तक्रारदार यांच्या कडून 3,000/-रुपये लाच रक्कम पंच साक्षीदार यांच्या समक्ष आरोपी क्रमांक 2 संतोष शेळके यांनी स्वीकारल्यानंतर पंचासमक्ष आरोपी क्रमांक 2 यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले असून आरोपी क्र.1 यांचा गावात शोध घेतला, परंतु तो मिळून आला नाहीत.<br>आरोपी लोकसेवक यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आलोसे यांच्या विरुध्द सोयगाव पोलीस स्टेशन छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर सापळा कारवाई ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी केली असुन पुढील तपास ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर घटक करणार आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, पोलीस उप अधीक्षक श्री राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरिक्षक श्री. केशव दिंड यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोह. अशोक नागरगोजे, राम गोर, रामेश्वर ताठे, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

**( राजीव तळेकर )**
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.